**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३६/२०१५</u>**
**<u>वंदना वि. बाबुराव व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.१०३ लगत आदेश</u>** ::–

वादीचे अधिवक्ता श्री. जी. एस. बिरादार यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्रमांक ६ चे अधिवक्ता श्री. गादगे गैरहजर आहेत. अर्ज सादर करणारे अधिवक्ता श्री. व्ही. सी. काळे यांचा वारंवार पुकारा केला असता ते हजर झाले नाहीत. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीने साक्षीप्रतिज्ञालेख निशाणी ३४ व ८० प्रमाणे साक्ष नोंदवली आहे. त्यावरील आदेश दिनांक २८/०९/२०१८, २१/०१/२०२५ आणि १२/०६/२०२४ प्रमाणे उलटतपास नाहीचा आदेश झाला होता. प्रतिवादी क्रमांक ६ ने अर्ज निशाणी ८९ प्रमाणे वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी प्राप्त केली. परंतू त्यांनतर प्रतिवादी क्रमांक ६ च्या वतीने वादीचा उलटतपास घेतलेला नाही. म्हणून मी दिनांक ०९/०७/२०२५ रोजी पुन्हा उलटतपास नाहीचा आदेश पारीत केला आणि प्रकरण पुढे चालविले. तसेच वादी साक्षीदार क्रमांक २ अनंदराव आणि साक्षीदार क्रमांक ३ गुरुनाथ यांचा सुध्दा उलटतपास नाहीचा आदेश झालेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये कोणाचा उलटतपास घ्यायचे आहे हे नमुद नाही. त्यामुळे अर्ज हा सामान्य कारणावर दाखल केलेला आहे. त्यामध्ये तथ्य नाही. सबब तो नामंजूर करण्यात येतो.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.11.27 17:40:13 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – २७–११–२०२५**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**